# प्रेस नोट ता. ३१/०७/२०१९
## बांधकाम साईटवर सबकॉन्ट्रक्ट घेवुन त्याच साईटवरच चोरी करणा-या सबकॉन्ट्रक्टरास हडपसर पोलीसांकडुन अटक

किंगस्ट्रन आवरा, स.नं. ८, हडपसर हांडेवाडी रोड,जय तुळजा भवानी मंगल कार्यालया समोर,हांडेवाडी पुणे या बांधकाम साईटवर नविन बिल्डींगचे बांधकामामध्ये इलेक्ट्रीकचे काम घेतलेले फिर्यादी कॉन्ट्रक्टर याचेकडे सबकॉन्ट्रक्टर म्हणुन कामास असलेल्या सबकॉन्ट्रक्टर कडुन वायर व कार असा एकुण १२लाख २हजार ७८ रुपयेचा मुदेमाल जप्त.

किंगस्ट्रन आवरा, स.नं. ८, हडपसर हांडेवाडी रोड, येथील बांधकामाचे इलेकट्रीक कॉन्ट्रँक फिर्यादि यांनी घेतले होते त्यांनी वायर फिटिंगचे सब कॉन्ट्रक्टर सतीश शाहुराजे इंगळे, वय ३८ वर्षे, रा. लिफाणे वस्ती, ईश्वर प्रेम अपार्टमेंट, ४ था मजला, दत्तनगर, कात्रज, पुणे यास दिले. फिर्यादी यांनी सदर बांधकाम साईटवरील एका स्टोअरमध्ये लागणारे साहित्य ठेवले होते. सदर साहित्या मधुनच फिर्यादी यांचा सबकॉन्ट्रक्टर हा दैनंदिन कामासाठी लागणा-या वस्तु फिर्यादीकडुन घेवुन जात असे. दिनांक २७/०७/२०१९ रोजी सायंकाळी ०६/३० ते दिनांक २८/०७/२०१९ रोजी सकाळी १०/०० चे दरम्यान फिर्यादी यांचे इलेक्ट्रीक वस्तुचे स्टोअर हे खिडकीव्दारे प्रवेशकरुन बाथरुमचा दरवाज्याचा कडीकोयंडा तोडुन सुमारे २ लाख ३२ हजार किंमतीच्या वायर चोरी गेले होते. सदरबाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. ७०५/२०१९ भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते हे करीत असताना त्यांनी सदर बांधकाम साईटवर काम करणा-या कामगारांची चौकशी केली असता त्यांना सबकॉन्ट्रक्टरचा संशय आला म्हणुन सबकॉन्ट्रक्टराची उलटतपासणी केली असता त्यानेच चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

इसम नामे सतीश शाहुराजे इंगळे, वय ३८ वर्षे, रा. लिफाणे वस्ती, ईश्वर प्रेम अपार्टमेंट, ४ था मजला, दत्तनगर, कात्रज, पुणे यास हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ७०५/२०१९ भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८० या गुन्हयात दिनांक ३०/०७/२०१९ रोजी अटक करण्यात आली असुन त्याचेकडुन चोरीस गेलेली वायर व गुन्हा करण्याकरीता वापरलेली कार असा एकुण १२ लाख २ हजार रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो.हवा. ३८६८ सपंत औचरे, पो.ना. २८०० प्रताप गायकवाड, पो.ना. ६४८९ विनोद शिवले, पो.ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो.ना. ५८५३ गणे्श दळवी, पो.शि. १०१५ अनिल कुसाळकर, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो.शि. ७६८४ शंशिकांत नाळे, पो.शि. ८३७६ अमित कांबळे, पो.शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**हडपसर पोलीस स्टेशन, पुणे**